Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2019 Special Issue - 139

## ग्रामीण साहित्य : एक चिंतन

**अतिथी संपादक**

डॉ. आर. जे. टेमकर

प्राचार्य,

दादा पाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

आदिनाथनगर, पाथर्डी, जि. अहमदनगर

**कार्यकारी संपादक**

डॉ. जालिंदर कानडे (मराठी विभागप्रमुख)

डॉ. चंद्रकांत काळे

डॉ. सुभाष देशमुख

दादा पाटील राजळे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

आदिनाथनगर, पाथर्डी, जि. अहमदनगर

**मुख्य संपादक**

डॉ. धनराज धनगर (येवला)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :

- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

PRINCIPAL

Savitribai College of Arts

Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International E- Research Journal* | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013) | February-2019
Special Issue 139 – ग्रामीण साहित्य : एक चिंतन
UGC Approved Journal

# अनुक्रमणिका


| अ.क्र | शीर्षक | लेखक/ लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | मराठी ग्रामीण कादंबरीतील सहकाराचे चित्रण | डॉ. सदाशिव सरकटे | 5 |
| 2 | १९८० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील राजकीय चित्रण | डॉ. सुभाष शेकडे | 12 |
| 3 | मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण | डॉ. माहेश्वरी गावीत | 16 |
| 4 | मराठी ग्रामीण साहित्याची संकल्पना, स्वरूप व प्रेरणा | डॉ. मच्छिंद्र मालुंजकर | 23 |
| 5 | १९६० नंतरच्या मराठी ग्रामीण कवितेचा विकास | डॉ. अनिल गर्जे | 32 |
| 6 | गत दशकातल्या ग्रामीण कादंबरीतील राजकीय चित्रण | डॉ. कैलास दौंड | 38 |
| 7 | 'प्रार्थनेची घंटा' मधील समाजदर्शन | प्रा. लक्ष्मण कोठावळे | 45 |
| 8 | साठोत्तरी ग्रामीण कादंबरी : प्रेरणा व स्वरूप | डॉ. जालिंदर कानडे | 49 |
| 9 | जागतिकीकरण आणि ग्रामीण कादंबरी | डॉ. रावसाहेब ननावरे | 52 |
| 10 | १९६० नंतरचे ललित लेख, ललित गद्य : काही निरीक्षणे | डॉ. सुभाष देशमुख | 56 |
| 11 | मराठी ग्रामीण कादंबरी व समाजपरिवर्तन | डॉ. द. के. गंधारे | 58 |
| 12 | मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री संघर्ष | डॉ.चंद्रकांत काळे | 62 |
| 13 | ग्रामीण साहित्य आणि मुकुंदराव पाटील | डॉ.संजय दरवडे | 66 |
| 14 | 'पाणी' धरणग्रस्तांचे जीवन चित्रण करणारी कादंबरी | डॉ. ए.बी.उगले | 70 |
| 15 | मराठी ग्रामीण कथांतील भाषिक वेगळेपण | डॉ. विठ्ठल जंबाले | 75 |
| 16 | मराठी ग्रामीण साहित्याचे स्वरूप व वेगळेपण | डॉ. निवृत्ती मिसाळ | 81 |
| 17 | मराठी ग्रामीण साहित्य व समाज जीवन | डॉ. अशोक डोळस | 83 |
| 18 | डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांची ग्रामीण कथा : एक शोध | डॉ. सुभाष पुलावळे | 87 |
| [redacted] | | | |
| 20 | ग्रामीण कादंबरीतील बदलते स्त्री चित्रण | डॉ. अनिता आढाव | 96 |
| 21 | ग्रामीण साहित्यातील राजकीय चित्रण | डॉ. व्ही. बी. बनसोडे | 101 |
| 22 | साठोत्तरी ग्रामीण कादंबरीतील सामाजिकता | डॉ. जी. पी. बोडखे | 104 |
| 23 | १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबऱ्यांचे रचनाविशेष | डॉ. प्रकाश सूर्यवंशी | 107 |
| 24 | ग्रामीण साहित्य : स्वरूप, प्रेरणा आणि वैशिष्ट्ये | डॉ. निलेश खरात | 110 |
| 25 | मराठी ग्रामीण साहित्य व समाज जीवन | डॉ. रंजना कदम | 114 |
| 26 | १९८० नंतरच्या ग्रामीण कवितेतील स्त्री भावनांचा आविष्कार | डॉ. वसंत सपकाळ | 119 |
| 27 | मुस्लिम साहित्यिकांच्या ग्रामीण मराठी कथा : एक चिकित्सक अभ्यास | डॉ. रमेश खिळदकर | 122 |
| 28 | १९९० नंतरचे मराठी साहित्यातील बदलते संदर्भ | प्रा. डी. बी. हारकर | 125 |
| 29 | मराठी ग्रामीण कादंबरी | डॉ. पोपट सिनारे | 128 |
| 30 | प्रयोगशील कादंबरीकार डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे | श्री. संतराम साबळे | 132 |
| 31 | मराठी ग्रामीण साहित्यातील स्त्री चित्रण | डॉ. संभाजी शिंदे | 135 |
| 32 | इंद्रजित भालेराव यांची ग्रामीण कविता (पीकपाणी व दूर राहिला गाव) | डॉ. कार्तिकी नांगरे | 140 |
| 33 | मरती ग्रामीण कविता | राजेश नेटके | 144 |
| 34 | 'धग' : एक विलक्षण वास्तव | प्रा.महेंद्र पाटील | 147 |
| 35 | ग्रामीण नाटक वाङ्मय | डॉ. राखी सलगर | 152 |
| 36 | मराठी ग्रामीण कथेची वाटचाल | प्रा. पी. टी. कांबळे | 154 |
| 37 | मराठी ग्रामीण साहित्य व समाज जीवन | हरेश शेळके | 157 |




PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 139 - ग्रामीण साहित्य : एक चिंतन | February-2019
UGC Approved Journal

# ग्रामीण कादंबरीचे बदलते स्वरूप

डॉ. देविदास मल्हारी शेटे,
मराठी विभाग प्रमुख,
सावित्रीबाई कला महाविद्यालय,पिंपळगाव पिसा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे.

ग्रामीण साहित्याची निर्मिती केव्हापासून झाली? असा प्रश्न पडतो तेव्हा आपणास असे लक्षात येते की, सन १९२५–२६ पासून ग्रामीण साहित्याची सुरुवात झाली असेच म्हणावे लागेल. याही अगोदर ग्रामीण साहित्याच्या खुणा आपल्याला चक्रधर स्वामींच्या जीवनावरील म्हाईंम भट यांनी लिहिलेल्या 'लिळाचरित्रातून' दिसून येतात त्याच्यापुढे आलो तर महात्मा फुले यांच्या लेखनांतून वास्तवदर्शी ग्रामीण जीवनाचे चित्रण घडते.

समाज हा परिवर्तनशील आहे. काळाप्रमाणे तो नेहमी बदलत असतो. याबदलत्या समाज जीवनाचे चित्रण साहित्यामधून येत असते. मराठी साहित्यामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात अनेक वांङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये ग्रामीण साहित्य हा एक महत्वाचा साहित्य प्रवाह आहे. ग्रामीण साहित्य हे ग्रामीण जीवनाशी निगडीत आहे. ग्रामीण भागातील समस्या, ताणतणाव, साहित्यामधून चित्रण करणे हा प्रधान हेतू ग्रामीण साहित्याचा आहे. मराठी साहित्यात विशेषत: ग्रामीण साहित्याचा विचार करताना स्वातंत्र्योत्तर काळातील ग्रामीण साहित्याचे बदलते स्वरूप हे फारच महत्त्वाचे ठरते. या काळात ग्रामीण साहित्याचे अनुभव क्षेत्र, आकलनाचे स्वरूप, आशय निर्मितीतील बदल, समाजाभिमुखता यामुळे ग्रामीण साहित्यातील समाजदर्शनाचा पटच बदलेला पाहावयास मिळतो. या बदलाचाच परिणाम असा की, समाजातील सर्वच स्तरांमध्ये परिवर्तन घडून आले व विविध स्वरूपाच्या साहित्यविषयक चळवळी सुरू झाल्या. या चळवळींनी मराठी साहित्याचे अनुभवविश्व समृध्द करण्याबरोबरच साहित्यविषयक काही महत्त्वाचे व मुलभूत प्रश्नही निर्माण केले.

०१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मीती झाल्यानंतर महाराष्ट्रात सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व कृषी क्षेत्रात जे बदल घडून आले या सर्व बदलांची दखल १९६० नंतरच्या ग्रामीण कांदबरीमधून घेतलेली आहे. या कालखंडात सामाजिक वास्तवाला अभिव्यक्त करणाऱ्या कादंबऱ्यांची परंपरा मोठी आहे. या काळात ग्रामीण कादंबरी लिहीणारे जे लेखक होते त्यामध्ये आनंद यादव, उध्दव शेळके, दि.बा.मोकाशी, श्री.ना. पेंडसे, शंकर पाटील, बाबुराव मुसळे, मोहन पाटील, रा. रं. बोराडे, ना.धो.महानुर, डॉ. नागनाथ कोतापल्ले या सर्वांचा उल्लेख आपणांस करावा लागतो.

ग्रामीण साहित्य व ग्रामीण कादंबरी ही १९६० नंतर खऱ्या अर्थाने बदलली या बदलाला अनेक घटक कारणीभूत झाले, देशाला मिळालेले स्वातंत्र्य, या स्वांतत्र्याने दिलेली नवीन मुल्य यामुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आणि ग्रामीण साहित्याच्या कक्षा रूंदावल्या. ग्रामीण जीवनातील दु:ख, दारिद्रय, बेकारी, महागाई, भ्रष्टाचार याबरोबर सहकार क्षेत्रात झालेली प्रगती यासारख्या अनेक घटकांचा परिणाम ग्रामीण जीवनावर झाला. या सर्वाचे चित्रण ग्रामीण कादंबरीमधुन येवू लागले. खऱ्या अर्थाने १९६० ते १९७० च्या दरम्यान जीवनाच्या सर्व स्थरांमधुन लेखन करणारे लेखक तयार झाले. या कालखंडात ग्रामीण कादंबरी निर्माण झाली व ती गुणवत्तेने ही चांगली होती. उदा. उध्दव शेळके यांची 'धग', दि.बा.मोकशी यांची 'देव चालले', [illegible]चक, श्री.ना.पेंडसे, शंकर पाटील यांची 'वावटळ'

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 68/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

ISSN : 2348-7143
February-2019

समाज जीवनातील कोणत्याही एका समूहाला त्या साकार करत नाहीत. तर समाजाचे सर्वांगिण चित्रण रेखाटण्याचा प्रयत्न करतात व ग्रामीण बोलीचा सहज, सुंदर अविष्कार सर्वच कादंबऱ्यांमधुन दिसून येतो. या दशकातील कादंबऱ्या विषयी डॉ. गणेश मोहिते आपल्या लेखात म्हणतात ''या काळातील कादंबरी ही समकालिन जीवनाशी नाते दृढ करते. समालिनजीवनाशय साकारते. काळाने निर्माण केलेल्या वास्तवाची विविध रूपे साकारता साकारता या व्यवस्थेच्या पाठीमागे असणाऱ्या शोषक प्रवृत्तींचा ही कादंबरी शोध घेते.''
स्वातंत्र्यानंतरच्या काळात साहित्यामध्ये काही परिवर्तने झाली. व साहित्याकडे बघण्याचा दृटिकोन बदलला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात सुशिक्षित झालेली संवेदनशील, सृजनशील तरुण पिढी आपले जीवनानुभव शब्दांकीत करु लागली. त्यांच्या साहित्यामधुन व्यक्त होणाऱ्या जाणिवा त्या काळात नवीन होत्या. मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याचा एक सकस साहित्य प्रवाह म्हणून १९६० नंतर वाटचाल करतो आहे. १९६० ते १९९० पासून पुढे अतिशय संवेदनशीलतेणे ग्रामीण साहित्य येताना दिसते. हा समकालीन वास्तवाचा प्रभावाच म्हणता येईल. जागतिकीकरण हा शब्द प्रचलित झाल्यानंतर विशेषत: मागच्या दहा वर्षात परिवर्तन इतक्या वेगात घडल की, समकालीन वास्तव गावातील माणूस भयचकित होऊन पाहू लागला आहे. इंटरनेट, मोबाईल आला यामुळे शहरातील कामकाजात गतिमानता आली, परंतु त्यातून गावचा विकास झाला का? हा प्रश्न निर्माण झाला आहे. शहरातील चंगळवादी भोगवादी संस्कृती ग्रामीण तरुणाच्या खांद्यावर हात टाकून खेडयापाडयात पोहोचली आहे. शेतात फळबाग लावल्या जात असल्या तरी जुनी मोठी झाडे तोडून टाकली जात आहेत. गावात सडक आली त्यावरुन जेवणासाठी ढाबा, दारु दुकानापर्यंत जाणे सोपे झाले. परंतु ज्या अद्यायावत कृषि तंत्रज्ञानाचा गवगवा केला जात आहे ते या रस्त्यावरुन गावापर्यंत आणि शेतापर्यंत पोहोचले नाही. रासायनिक खतेसुध्दा काळ्या बाजरातून खरेदी करावी लागत आहेत. याला गरीब शोकांतिकाच म्हणावी लागेल.

फंदरीत १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीची अनेक बदलती रूपे आपणांस पाहवयास मिळतात. तसेच सर्वच साहित्यावर जागतिकीकरणाचा परिणाम झाला आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनात खुपच मोठे बदल होत आहेत. ग्रामीण जीवनातला खरा माणुस हरवत चालला आहे. प्रत्येक माणुस स्वार्थी झालेला आहे. शेती तंत्रज्ञानातील बदल आधुनिक शेती पध्दती, औद्योगीकरण यामुळे प्रदुषणात झालेली वाढ तसेच निसर्गाचा असमतोलपणा याचा विपरीत परिणाम ग्रामीण जीवनावर व शेतीवर झाला असून, अनेक खेडी विस्थापित झालेले आपण पाहतो आहोत. या सर्वांचे चित्रण कादंबरीमधुन दिसून येत आहे.

खऱ्या अर्थाने १९६० नंतरच्या ग्रामीण कादंबरीमधुन सुरूवातीला ग्रामीण जीवनाचे चित्र आले. १९८० नंतर त्यामध्ये हळूहळू बदल होवून ग्रामीण जीवनाच्या समस्या ती मांडू लागली. ग्रामीण जीवनाशी निगडीत असलेला शेतकरी यांच्या वाटयाला येणारी दु:ख आणि दारिद्रय यांचे चित्रण कादंबरीमधुन यायला लागले. पूर्वीच्या कादंबरीमधील रोमॅन्टिसिझम जाऊन सामाजिक समस्यांचे चित्रण ती करू लागली. ग्रामीण जीवनाशी निगडीत असलेला शेतकरी, दुश्काळ, निसर्गाचा असमतोलपणा, प्रदुषण यामुळे त्यांच्या वाटयाला येणारे दु:ख तसेच राजकारण, अर्थकारण, धर्मकारण याचा शेतकरी जीवनावर झालेला परिणाम, चळवळींचा परिणाम याचे चित्रण कादंबरीमधुन यायला लागले. आज भारतासारख्या कृषीप्रधान देशामध्ये शेतकऱ्यांची काय अवस्था आहे? खरचं शेतकरी समृद्ध व सुखी झाला आहे का? याला जबाबदार कोण? या सर्वांचे चित्रण ग्रामीण कादंबरीमधुन आले पहिजे. जागतिकीकरणाला सामोरे जायचे असेल तर, जात, धर्म, पंथ, ग्रामीण, शहरी याच्या पलिकडे जावून विचार करावा लागेल.

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

संदर्भ –

१. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले – 'साहित्याचा अन्वयार्थ', – स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र. २१३.
२. प्रा.डॉ.शैलेंद्र त्रिभुवन – 'सक्षम समिक्षा' – शब्दाली प्रकाशन,पुणे, ऑक्टो.–डिसेंबर २०१३. डॉ. नगरकर यांचा लेख पृ.क. ५५.
३. डॉ. ठाकुर रविंद्र – मराठी ग्रामीण कादंबरी – स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे – पृ.क.८.
४. संपादक, डॉ. भास्कर शेळके – 'मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना'–डॉ.गणेश मोहिते यांचा लेख – पृ.क. ३९५.
५. संपादक, डॉ. भास्कर शेळके – 'मराठी दलित ग्रामीण कादंबरी तुलना'
६. ग्रामिण साहित्य स्वरूप व दिशा–वासुदेव मुलाटे–कैलास पब्लिकेशन औरंगाबाद

Savitribai College of Arts ★ Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar ★ ID. No. PU/AN/A/58/1999

PRINCIPAL
**Savitribai College of Arts**
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar